|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव



## माध्यमशास्त्र प्रशाळा

### सन २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु

- **M. A. Mass Communication and Journalism**

**एम.ए. मास कम्युनिकेशन अॅण्ड जर्नालिझम**

**शैक्षणिक पात्रता :** कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर, पदवी परीक्षेला किमान ४० टक्के गुण असणे अनिवार्य आहे. प्रवेश क्षमता- ३० विद्यार्थी. कालावधी : दोन वर्ष

- **B. A. Mass Communication and Journalism**

**बी.ए. मास कम्युनिकेशन अॅण्ड जर्नालिझम**

**शैक्षणिक पात्रता :** किमान ४० टक्के गुणांसह इयत्ता बारावी उत्तीर्ण. प्रवेश क्षमता- ६० विद्यार्थी. कालावधी : चार वर्ष

- **Diploma in Journalism - पत्रकारिता पदविका**

**शैक्षणिक पात्रता :** किमान ४० टक्के गुणांसह इयत्ता बारावी उत्तीर्ण. प्रवेश क्षमता- ६० विद्यार्थी. कालावधी : एक वर्ष

- **Certificate Course in Journalism**

**पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

**• Online Mode Courses •**

- Certificate Course of Public Relation - जनसंपर्क
- Certificate Course of Radio Jocky - रेडिओ जॉकी
- Certificate Course of Digital and Social Media - डिजिटल आणि सोशल मीडिया
- Certificate Course of Writing for Newspaper - रायटींग फॉर न्यूजपेपर

**• Offline Mode Courses •**

- Certificate Course of Video Editing- व्हिडिओ एडिटींग
- Certificate Course of Camera Handelling - कॅमेरा हॅंडलिंग
- Certificate Course of Pagination - न्यूजपेपर पेजीनेशन

**शैक्षणिक पात्रता :** किमान ४० टक्के गुणांसह इयत्ता बारावी उत्तीर्ण. प्रवेश क्षमता- ३० विद्यार्थी (प्रती अभ्यासक्रम) कालावधी : तीन महिने, फक्त रविवारी तासिका (नोकरी, व्यवसाय सांभाळून करता येईल)



### करिअर, व्यवसाय, नोकरीच्या भरपूर संधी

वृत्तपत्रे, रेडिओ, टी.व्ही. चॅनल्स, वेब चॅनल्स, विविध शासकीय, निमशासकीय व खाजगी कार्यालयामध्ये जनसंपर्क अधिकारी, संवाद तज्ज्ञ, कॉपी रायटर, कंटेंट रायटर, रेडिओ जॉकी अशा करियरच्या अनेक संधी उपलब्ध.

*• अधिक माहितीसाठी संपर्क •*


• डॉ. सुधीर भटकर, संचालक -9423490044, 8407922404 •

• डॉ.गोपी सोरडे 9834166072

• डॉ. सोमनाथ वडनेरे 9850693705

एम.ए. (एम.सी.जे.) दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि इयत्ता बारावी नंतरचा चार वर्षीय बी. ए. (एम.सी.जे.) पदवी अभ्यासक्रम आणि इयत्ता बारावी नंतरचा एक वर्षीय पत्रकारिता पदविका अभ्यासक्रम (Diploma in Journalism) तसेच तीन-तीन महिने मुदतीचे पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Course in Journalism) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होईल. त्याकरिता कृपया वेळोवेळी विद्यापीठाच्या http://www.nmu.ac.in या संकेत स्थळाचे अवलोकन करावे. प्रवेशाच्या अधिक माहितीसाठी सोबतची माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचावी.

- **एम.ए. (एम.सी.जे.) दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम**
  **(M.A. Mass communication and Journalism)**

- **बी.ए. (एम.सी.जे.) चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम**
  **(B. A. Mass communication and Journalism)**

- **पत्रकारिता पदविका एक वर्षीय अभ्यासक्रम**
  **(Diploma in Journalism)**

- **पत्रकारिता प्रमाणपत्र तीन महिन्यांचे अभ्यासक्रम**
  **(Certificate Course in Journalism)**

# प्रवेश माहिती पुस्तिका


## माध्यमशास्त्र प्रशाळा

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**उमवि नगर, जळगाव - ४२५ ००४ (महाराष्ट्र राज्य)**

**सपंर्कासाठी भ्रमणध्वनी : 8407922404, 9834166072**

**दूरध्वनी : 0257 - 2258436, 445, 438**

**वेबसाईट : http://www.nmu.ac.in**

**E-mail- mcjkbcnmu@gmail.com**

# * माध्यमशास्त्र प्रशाळा *

माहिती आणि संवाद तंत्रज्ञान तसेच सोशल मीडिया आणि प्रसार माध्यमांच्या क्षेत्रामध्ये झपाट्याने बदल होत आहेत. कार्पोरेट आणि विपणन उद्योगाचा विस्तारही तितक्याच वेगाने होत आहे. या परिस्थितीमध्ये प्रशिक्षित आणि सक्षम मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण झाली आहे. ही वस्तुस्थिती डोळ्यासमोर ठेवून या क्षेत्रात सक्षम आणि प्रभावी विद्यार्थी घडविण्याकरीता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने (पूर्वीचे उमवि) जनसंवाद आणि पत्रकारिता विभाग २००६-२००७ मध्ये सुरु केला. या विभागांतर्गत एम.ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) हा दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहे. शैक्षणिक सत्र २०१०-११ पासून एम.ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) पदव्युत्तर अभ्यासक्रम सत्र पध्दतीनुसार सुरु करण्यात आलेला आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून बी.ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) हा पदवी अभ्यासक्रम सत्र पध्दतीनुसार सुरु करण्यात येत आहे. तसेच पत्रकारिता पदविका (Diploma in Journalism) हा बारावी नंतरचा एक वर्षीय अभ्यासक्रम सन २०२२-२३ पासून सुरु करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम वार्षिक पध्दतीचा असून विद्यार्थ्यांमध्ये पत्रकारितेचे कौशल्य विकसित करणार आहे. याशिवाय सन २०२४-२५ पासून सात प्रकारचे बारावी नंतरचे पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Course in Journalism) सुरु करण्यात आले आहेत. यात रेडिओ जॉकी, डिजिटल आणि सोशल मीडिया, जनसंपर्क वृत्तपत्रांसाठी लेखन हे अभ्यासक्रम **ऑनलाईन पद्धतीने** तर कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, वृत्तपत्र सजावट व मांडणी हे **ऑफलाईन पद्धतीने** शिकविले जातील. सदर अभ्यासक्रम हे तीन-तीन महिने मुदतीचे अभ्यासक्रम असून विद्यार्थ्यांमध्ये पत्रकारितेचे कौशल्य विकसित करणारे आहेत.

तज्ज्ञ शिक्षकवर्ग, संगणक लॅब, प्रशस्त वर्ग खोल्या, दृकश्राव्य साधने, अध्यापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, प्रशाळांतर्गत ग्रंथालय ही या प्रशाळेची वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता प्रशाळेतर्फे वेळोवेळी विविध उपक्रम/ कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख चढता राहिलेला आहे. पत्रकारितेच्या सैध्दांतिक ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांचे सखोल अध्ययन करता यावे, यासाठी विद्यार्थ्यांना मुद्रीत व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसोबतच जाहिरात संस्था आणि जनसंपर्क कार्यालय आदी ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. पत्रकारितेचे व्यापक क्षेत्र लक्षात घेता केवळ अभ्यासक्रमावर आधारित शिक्षण न देता विद्यार्थ्यांना सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच अन्य क्षेत्रांचीही माहिती व्हावी याकडे प्रशाळेने विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. याचाच भाग म्हणून प्रशाळेत

विविध विषयांवरील परिसंवाद, परिषदा, कार्यशाळा, मान्यवरांची व्याख्याने, मुलाखती इत्यादीचे आयोजन केले जाते. वादविवाद स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, क्रीडा स्पर्धा तसेच संशोधन क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा यासाठी प्रशाळेच्यावतीने वैयक्तिक मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देण्यात येते. अल्पावधीतच प्रशाळेने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. याचाच परिपाक म्हणून प्रशाळेचे विद्यार्थी विविध वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, माहिती व जाहिरात संस्था, जनसंपर्क संस्था, जनसंपर्क महासंचानालय आदि ठिकाणी वेगवेगळ्या पदांवर कार्यरत आहेत.

प्रशाळेतील अकरा विद्यार्थ्यांनी पत्रकारिता अभ्यासक्रमात सर्वाधिक गुण संपादीत करून विद्यापीठातर्फे प्रदान करण्यात येणारे सुवर्णपदक मिळविण्याचा बहुमान घेतला आहे. सोबतच जनसंवाद आणि पत्रकारिता या विषयात विद्यापीठात प्रथम येणा-या विद्यार्थीनीला मिळणारा कै.कमलाताई चौघुले पुरस्कार देखील प्रशाळेतील विद्यार्थीनींनी मिळविलेला आहे. प्रशाळेचे आठ विद्यार्थी नेट /सेट उत्तीर्ण झाले असून सात विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केलेली आहे. दरवर्षी प्रशाळेचा निकाल उत्कृष्ट राहिला आहे. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा याकरीता प्रशाळेतर्फे त्यांना विविध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्याचाच भाग म्हणून विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परिसरातील तसेच महाराष्ट्रात इतरत्र आयोजित वाद-विवाद स्पर्धा, नाट्य स्पर्धा, संशोधन स्पर्धा, क्रीडा स्पर्धा आदी ठिकाणी सहभाग नोंदवून घवघवीत यश संपादन केले आहे. जनसंवाद आणि पत्रकारिता क्षेत्रासोबतच साहित्य, नाट्य, संगीत, समाजकारण, राजकारण या क्षेत्रातील मान्यवरांशी विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संपर्क व्हावा याकरीता प्रशाळेने महाराष्ट्र भूषण कविवर्य मंगेश पाडगावकर, कवी अरूण म्हात्रे, संगणक तज्ज्ञ अच्युत गोडबोले, पहिले विश्वमराठी साहित्य संमेलन अध्यक्ष गंगाधर पानतावणे, लोकप्रभाचे संपादक विनायक परब, पाकिस्तान येथील जेष्ठ पत्रकार कुट्टी, मुंबई येथील अमेरिकन उच्च आयुक्तालयाच्या क्रिस्टन डॅलबेलो व सुमेधा रायकर, ज्येष्ठ पत्रकार सचिन परब, सुप्रसिद्ध अभिनेते डॉ. गिरीष ओक, माहिती जनसंपर्क महासंचालयानालयाचे उपसंचालक डॉ. किरण मोघे, आदी अनेक मान्यवरांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. भारत सरकारच्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल डिफेन्स, मिनीस्ट्री ऑफ सोशल जस्टीस एण्ड एम्पावरमेंट, नवी दिल्ली यांच्या वतीने 'ट्रान्सजेंडर' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आल्यात. माध्यमशास्त्र प्रशाळा आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क संचालनालयाच्या नाशिक येथील विभागीय माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, विभागीय अधिस्विकृती समिती, नाशिक विभाग, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने `विकास पत्रकारिता : काल, आज आणि उद्या` या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

प्रशाळेतर्फे दरवर्षी स्थानिक व शहराबाहेरील अभ्यासदौ-याचे आयोजन करण्यात येते. स्थानिक अभ्यासदौ-यांतर्गत विद्यार्थ्यांना येथील वृत्तपत्र कार्यालय, आकाशवाणी केंद्र, जिल्हा माहिती कार्यालय, जाहिरात संस्था, मुद्रण व प्रकाशन संस्था या ठिकाणी नेण्यात येते. तर शहराबाहेरील आयोजित अभ्यासदौ-यांतर्गत मुंबई, माऊंट आबू, दिल्ली, आग्रा व अमृतसर, हैद्राबाद, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद), भोपाल, इंदौर, सांची, पुणे, नाशिक आदी ठिकाणी विद्यार्थ्यांना नेण्यात आले होते. मुंबई येथे आयोजित अभ्यासदौ-यात विद्यार्थ्यांनी वृत्तपत्र कार्यालय, न्यूज चॅनेल्स, दूरदर्शन केंद्र, आकाशवाणी केंद्र, चित्रपट नगरी, जनसंपर्क आणि माहिती महासंचनालय आदी ठिकाणी भेटी देवून तेथील कामकाजाची माहिती घेतली. माऊंट आबू येथे आयोजित अभ्यासदौ-यात विद्यार्थ्यांना 'माध्यमांची नैतिकता' या विषयावर आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेत प्रसारमाध्यमातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. तर दिल्ली, आग्रा व अमृतसर असा संयुक्तपणे आयोजित अभ्यासदौ-यात विद्यार्थ्यांनी दिल्ली येथे वृत्तपत्र नोंदणी कार्यालय, हिंदी न्यूज चॅनेल्स, दूरदर्शन केंद्र, माध्यम नियंत्रण संस्था, वृत्तपत्र नोंदणी कार्यालय यांना भेटी दिल्या. तसेच माजी राष्ट्रपती मा. सौ. प्रतिभाताई पाटील, माजी केंद्रीय कृषीमंत्री मा.शरदचंद्र पवार या मान्यवरांच्या भेटी घेतल्या होत्या. सोबतच दिल्ली येथील राष्ट्रपती भवन व इतर प्रेक्षणिय स्थळांना भेटी देवून माहिती घेतली. आग्रा येथील ताजमहल व अमृतसर येथील वाघा बॉर्डर आणि सुवर्णमंदीर बघून विद्यार्थ्यांना विशेष उत्साह लाभला. हैद्राबाद येथील चित्रपट नगरी व प्रसारमाध्यमांच्या कार्यालयाचा आवाका बघून विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. पुणे येथील फिल्म इन्स्टिट्यूट, भोपाल येथील माधवराव सप्रे वृत्तपत्र संग्रहालय, इंदौर येथील वेब दुनिया पोर्टल, अहिल्यादेवी विश्वविद्यालयातील पत्रकारिता विभाग आणि सांची आदि ठिकाणीही भेटी दिल्या. तसेच नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, दादासाहेब फाळके स्मारक, यासह ज्येष्ठ संपादक, लेखक, उत्तम कांबळे आणि ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे यांच्याशी संवाद साधला. या शिवाय दरवर्षी प्रशाळेतर्फे आयोजित विविध उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना मिळते.

माध्यम क्रांतीचा आणि माहितीच्या स्फोटाचा परिणाम म्हणून प्रसिध्दी माध्यमांमध्ये आमुलाग्र व झपाट्याने बदल, विकास होत असून या क्षेत्रातील आव्हाने पेलण्यास सक्षम मनुष्यबळाचा अभाव जाणवत आहे. ही आव्हाने पेलण्यास सक्षम मनुष्यबळ तयार करण्यास प्रशिक्षित करण्याच्या हेतूने अद्ययावत माहिती तंत्रज्ञानाच्या समावेशाचा जनसंवाद आणि पत्रकारिता या दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सत्रपध्दतीनुसार शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून सुरु करण्यात आला आहे. भविष्यात माध्यमांप्रमाणे जनसंपर्काचे महत्व वादातीत राहणार असून सामाजिक जगासह उद्योग, सहकार, शिक्षण, आरोग्य, व्यापार व प्रत्येक क्षेत्रात शैक्षणिक सत्र २०१०-११ पासून एम.ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) पदव्युत्तर अभ्यासक्रम सत्र पध्दतीनुसार

सुरु करण्यात आलेला आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून बी.ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) हा पदवी अभ्यासक्रम सत्र पध्दतीनुसार सुरु करण्यात येत आहे. तसेच पत्रकारिता पदविका (Diploma in Journalism) हा बारावी नंतरचा एक वर्षीय अभ्यासक्रम सन २०२२-२३ पासून सुरु करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम वार्षिक पध्दतीचा असून विद्यार्थ्यांमध्ये पत्रकारितेचे कौशल्य विकसित करणार आहे. याशिवाय सन २०२४-२५ पासून सात प्रकारचे बारावी नंतरचे पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Course in Journalism) सुरु करण्यात आले आहेत. यात रेडिओ जॉकी, डिजिटल आणि सोशल मीडिया, जनसंपर्क वृत्तपत्रांसाठी लेखन हे अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने तर कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, वृत्तपत्र सजावट व मांडणी हे ऑफलाईन पद्धतीने शिकविले जातील. सदर अभ्यासक्रम हे तीन-तीन महिने मुदतीचे अभ्यासक्रम असून विद्यार्थ्यांमध्ये पत्रकारितेचे कौशल्य विकसित करणारे आहेत. प्रशाळेत अद्ययावत ऑडिओ-व्हिडिओसाठी स्वतंत्र व्यवस्था असून लवकरच अत्याधुनिक स्टुडिओची निर्मिती करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने माध्यमशास्त्र प्रशाळेसाठी २५ कोटी रुपयांचा निधि मंजूर केला असून यात स्वतंत्र इमारतीसाठी ८ कोटी, वसतीगृहासाठी ७ कोटी, व्हिडिओ-ऑडिओ स्टुडिओ साठी ५ कोटी, आणि मनुष्यबळा साठी ५ कोटी असा २५ कोटीचा निधि मंजूर केला असून त्यासंदर्भातील कार्यवाही सुरु आहे.

माध्यमशास्त्र प्रशाळा ही व्यासंगी व व्यापक शैक्षणिक दृष्टीकोन बाळगणारे दूरदर्शी विचारांचे द्रष्टे मा.कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु, मा.कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखाधिकारी, विविध विद्याशाखांचे मा. अधिष्ठाता आणि विद्यार्थी हाच विद्यापीठाचा मध्यवर्ती घटक मानून शैक्षणिक व संशोधनात्मक आखणी करणारे विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी, शिक्षक या सर्वांच्या व्यापक प्रयत्नातून ही प्रशाळा विकसित झाली आहे आणि होत आहे.

# प्रवेश क्षमता व शैक्षणिक पात्रता

| | |
|---|---|
| **१) अभ्यासक्रम** | **एम.ए. जनसंवाद आणि पत्रकारिता (MA. MCJ)** |
| प्रवेश क्षमता | ३० |
| शैक्षणिक पात्रता | कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर, पदवी परीक्षेला किमान ४०% गुण असणे अनिवार्य आहे. |
| **२) अभ्यासक्रम** | **बी.ए. जनसंवाद आणि पत्रकारिता (B.A.MCJ)** |
| प्रवेश क्षमता | ६० |
| शैक्षणिक पात्रता | इयत्ता बारावी उत्तीर्ण किमान ४०% गुण असणे अनिवार्य आहे. |
| **३) अभ्यासक्रम** | **पत्रकारिता पदविका (Diploma in Journalism)** |
| प्रवेश क्षमता | ६० |
| शैक्षणिक पात्रता | इयत्ता बारावी उत्तीर्ण किमान ४०% गुण असणे अनिवार्य आहे. |
| **४) अभ्यासक्रम** | **पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Course in Journalism)** |
| | **ऑनलाईन पद्धत** - रेडिओ जॉकी, डिजिटल आणि सोशल मीडिया, जनसंपर्क, वृत्तपत्रांसाठी लेखन<br>**ऑफलाईन पद्धत** - कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, वृत्तपत्र सजावट व मांडणी. |
| प्रवेश क्षमता | ३० |
| शैक्षणिक पात्रता | इयत्ता बारावी उत्तीर्ण किमान ४०% गुण असणे अनिवार्य आहे. |

# प्रवेशाबाबतचे नियम

1) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाच्या आरक्षित जागा दोन्ही विषयांच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे मागासवर्गीयांसाठी त्या त्या टक्केवारीने जागा राखीव आहेत. त्यासाठी आरक्षित जागांचा तक्ता खालीलप्रमाणे

| **आरक्षित जागांचे टक्केवारीनुसार प्रमाण** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SC<br>13% | ST<br>7% | DT(A)- 3%<br>NT(1)-2.5%<br>NT (2)- 3.5%<br>NT(3)- 2% | OBC<br>19% | EWS<br>10% | Other University<br>10% | Active Ex Service Men<br>2% | Handicap<br>3% |
| | अनुसूचित जाती<br>१३% | अनुसूचित जमाती<br>७% | डी.टी.-३%<br>एन.टी (अ)-<br>२.५%<br>एन.टी (ब)-<br>३.५%<br>एन.टी.(क)-२% | इतर मागास वर्गीय<br>१९% | इडब्ल्यूएस<br>१०% | इतर विद्यापीठ विद्यार्थी १०% | माजी सैनिक व सैनिकांचे पाल्य<br>२% | अपंगासाठी<br>३% |

१) मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या त्या-त्या संवर्गातील उमेदवार/विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास त्या रिक्त जागांमधून २% जागा विशेष मागासवर्गातील (S.B.C.) विद्यार्थ्यास पात्रतेनुसार प्रवेश दिला जाईल.

२) इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी १०% जागा राखीव आहेत.

३) अपंगासाठीच्या ३% जागांच्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-यास सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) आजी / माजी सैनिक आरक्षणाकरीता राखीव असलेल्या २% जागा भरतांना विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परिपत्रक क्र.९२/२००५, दि. मार्च २००५ अनुसार कार्यवाही करण्यात येईल. प्रवेशित विद्यार्थ्याचे पालक माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) प्रवेश प्रक्रियेच्या दुस-या फेरीच्या अखेरीस रिक्त राहिलेल्या जागा भरत असतांना इतर विद्यापीठे / राज्य या कार्यक्षेत्रातून विद्यार्थी घेण्याचे कमाल संख्येचे (एकूण प्रवेश क्षमतेच्या १०%) बंधन लागू राहणार नाही. तथापी अशा रिक्त राहिलेल्या जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश करण्यापूर्वी गुणवत्ता यादीतील अन्य विद्यापीठाच्या क्षेत्रातील तसेच महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी प्रवेशासाठी उपलब्ध नाहीत. याची खात्री करूनच कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

६) मागासवर्गीयांसाठी आरक्षित केलेल्या जागांवर प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी लागेल. हे प्रमाणपत्र महाराष्ट्रातील दंडाधिकारी / तहसीलदार/

न्यायदंडाधिकारी यांनी दिलेले असावे व त्यात उमेदवारांची जात ही महाराष्ट्रात मागासवर्गीय म्हणून समाविष्ट असल्याची नोंद असावी.

७) एन.टी.-२, एन.टी-३ व इतर मागासवर्गीय संदर्भातील उमेदवाराच्या प्रवेश अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्रासोबतच संबंधित उमेदवाराच्या जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी अथवा उपविभागीय अधिका-याने प्रमाणित केलेल्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्रकाची साक्षांकित सत्यप्रत (प्रवेशित वर्षातील) जोडावी. उमेदवाराने प्रत्यक्ष प्रवेशाच्या (Spot Admission) वेळी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची मुळप्रत सादर न केल्यास त्याच्या प्रवेश खुल्या संवर्गातूनच ग्राह्य धरला जाईल व आरक्षित जागेवर प्रवेशित विद्यार्थ्याला मिळणारे शुल्क सवलतीचे लाभ मिळणार नाहीत.

८) कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील पुरेसे विद्यार्थी प्रवेशासाठी उपलब्ध नसतील. तर दुस-या / बाहेरील विद्यापीठांच्या परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना, त्यांच्यासाठी राखीव असलेल्या १०% जागांच्या अतिरिक्त अन्य रिक्त जागांवर त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्रवेश दिला जाईल.

९) विद्यापीठाच्या प्रशाळा शैक्षणिक विभागाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास त्याच्या दोन्ही शैक्षणिक वर्षात विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात प्रवेश स्थानांतरित (Transfer) करता येणार नाही. अर्थात घेतलेला प्रवेश रद्द करून संलग्नित महाविद्यालयाच्या कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यास त्याला मुभा राहील.

१०) प्रवेशाच्या संदर्भात महाराष्ट्रात राज्य शासनाने मागासवर्गीयांच्या आरक्षणाच्या धोरणात जर ही प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी / पूर्ण होण्यापूर्वी काही बदल केले, तर त्या धोरणांच्या विचार करण्यात येऊन त्याप्रमाणे आरक्षणाचे धोरण राबविले जाईल.

११) शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीत व प्रवेश क्षमतेत बदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

१२) एखाद्या मागासवर्गीय घटकांसाठी पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा नियमानुसार व गुणवत्तेनुसार मागासवर्गीयांच्या इतर घटकांमधून खालीलप्रमाणे भरण्यात येतील. उदाहरणार्थ-

एस.टी. - एस.सी. - डी.टी. / एन.टी. (१, २, ३) - ओबीसी

१३) यानंतर ही संवर्गातील जागा शिल्लक राहिल्यास एस.बी.सी. (२%) प्रवेश क्षमतेच्या प्रवर्गातील जागा भरण्यात येतील.

१४) राखीव संवर्गातून जागा शिल्लक राहिल्यास त्या खुल्या संवर्गातून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

१५) एम.ए. भाग-१ केल्यानंतर काही विद्यार्थी कालावधीचा खंड पडल्यानंतर पुन्हा एम.ए. भाग-२ करीता प्रवेशाची मागणी करतात. तेव्हा याबाबत विद्यार्थ्यांना भाग-१ च्या प्रवेशासाठी असलेला अभ्यासक्रम बदलला नसल्यास त्या विद्यार्थ्यांना भाग-२ करीता प्रवेश देण्यात येईल किंवा विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रवेश देण्यात येईल.

१६) काही अभ्यासक्रमांना (ऑनलाईन किंवा सुटीच्या दिवशी असणाऱ्या ऑफलाईन) नोकरी करणारे व्यक्तीदेखील प्रवेश घेऊ शकतात. परंतु त्यांना ते जेथे नोकरी करतात त्या संस्थेचे / कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र प्रवेश घेतेवेळी सादर करणे आवश्यक राहिल.

**१७) माहिती पत्रकात नमुद केलेल्या शुल्कात शासनाने किंवा विद्यापीठाच्या शुल्कनिर्धारण समितीने वाढ अथवा कमी केल्यास त्यानुसार प्रवेश शुल्क प्रवेश शुल्क अदा करणे विद्यार्थ्यांस बंधनकारक राहील.**

## प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्क परतीचे नियम

विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळे अंतर्गत असलेल्या पदव्युत्तर आणि पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास अशा प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क परत करण्याबाबतचे नियम विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निर्देशनानुसार विद्यापीठाच्या वित्त विभागाने निर्धारित केले आहेत. तेच नियम या विद्यार्थ्यांना लागू राहतील ते नियम खालीलप्रमाणे :

i) In an event of a student canceling admission within a period of Seven Days from the date of admission, deduction of 10% of total amount of tution fees in addition to the amount of Rs.500/- will be made.

ii) In an event of student canceling admission within a period of 15 Days from the date of admission, deduction of 25% of total amount of tuition fees in addition of the amount of Rs.500/- will be made.

iii) In an event of a student canceling admission within a period of 15 Days from the date of admission refund towards any kind of fees will not be given

iv) एखाद्या विद्यार्थ्याने संबंधित अभ्यासक्रमासाठी विहीत पूर्ण शुल्क न भरता प्रवेश घेतला असल्यास त्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्दचा अर्ज सादर केल्यास सदर विद्यार्थ्यास **विहीत शुल्क संपूर्ण भरल्याशिवाय प्रवेश रद्द करता येणार नाही व त्याशिवाय मूळ कागदपत्रे परत मिळणार नाही.**

(* प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क परत करतांना विद्यार्थ्याने ज्या तारखेस प्रवेश घेतला असेल ती तारीख date of Admission म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.)

# प्रवेश प्रक्रियेचे टप्पे

**(Stages of Admission Process)**

१) एम.ए. (एम.सी.जे.), बी.ए. (एम.सी.जे.) आणि पत्रकारिता पदविका (Diploma in Journalism) अभ्यासक्रमाचे माहिती पत्रक विद्यापीठाच्या http://www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रवेशाकरीता **http://www.nmuj.digitaluniversity.ac** ऑनलाईन ॲडमिशन पोर्टलवर क्लिक करून सदरचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या सूचनेनुसार भरून सबमिट करावा. तर प्रमाणपत्र (Certificate Course) अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी प्रशाळेच्या कार्यालयात संपर्क करावा.

२) इच्छुक उमेदवाराने माहितीपत्रक व प्रवेश अर्जातील सर्व माहिती काटेकोरपणे व काळजीपूर्वक वाचली पाहीजे व त्यानुसार ऑनलाईन अर्ज भरला पाहिजे.

३) विद्यार्थ्याने आपल्या ऑनलाईन अर्जासोबत आवश्यक दस्ताऐवजांच्या / प्रमाणपत्रांच्या स्कॅन कॉपीज ॲटेच करून पाठविणे बंधनकारक आहे.

४) प्रवेशाचा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर प्रत्यक्ष प्रवेशाकरिता मूळ कागदपत्रासह विभागात विद्यार्थ्याला येणे गरजेचे आहे. विद्यापीठाच्या वेबसाईटवर दिलेल्या सूचनानुसार कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी वेळोवेळी विद्यापीठाच्या वेबसाईटचे अवलोकन करावे.

५) प्रवेश घेते वेळी विद्यार्थ्यास प्रवेश शुल्काची रक्कम विद्यापीठाने दिलेल्या Payment Getway वर भरावी लागेल.

६) उमेदवाराने एकदा प्रवेश घेतल्यानंतर त्यास प्रवेश रद्द होईपर्यंत मूळ प्रमाणपत्र कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही. उमेदवाराची पात्रता पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रमाणपत्रांची पडताळणी केल्यानंतर प्रवेशासोबत घेतलेली मूळ प्रमाणपत्र परत करण्यात येतील.

७) निश्चित केलेला प्रवेश रद्द केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पुर्नप्रवेश मिळणार नाही.

## एम.ए. (एम.सी.जे.) प्रवेश घेतेवेळी सादर करावयाची कागदपत्रे

विविध संवर्गातून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी खालील नमूद केलेली मूळ कागदपत्रे तथा त्यांच्या साक्षांकित छायांकित ३ प्रती विद्यार्थ्यास सूचना देण्यात येईल तेव्हा विभागात प्रत्यक्ष येवून सादर करणे आवश्यक राहील.

- मूळ पदवी गुणपत्रक व साक्षांकित छायांकित ३ प्रती
- मूळ स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer / leaving Certificate) साक्षांकित छायांकित ३ प्रती
- जातीचे मूळ प्रमाणपत्र व साक्षांकित छायांकित ३ प्रती
- प्रगत व उन्नत गटाच्या मूळ दाखला (Non Creamy layer Certificate) व साक्षांकित छायांकित ३ प्रती
- विद्यापीठ बदल असल्यास स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)
- शिक्षणात खंड असल्यास खंड दाखला (Gap Certificate)
- पात्रता अर्ज
- ज्या संवर्गातून प्रवेश घेणार आहे, त्याच्याशी संबंधित आवश्यक ती प्रमाणपत्रे.

**टिप :** मूळ प्रमाणपत्रे हे पात्रतेसाठी जमा केली जात असल्यामुळे महत्वाच्या कामासाठी उदा.वसतिगृह प्रवेश, शिष्यवृत्ती इत्यादीसाठी मूळ प्रमाणपत्राच्या जास्तीत जास्त छायांकित प्रती करून स्वत:जवळ ठेवाव्यात. पात्रता पूर्ण झाल्याशिवाय मूळ प्रमाणपत्र परत मिळणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

## बी.ए. (एम.सी.जे.) ला प्रवेश घेतेवेळी सादर करावयाची कागदपत्रे

विविध संवर्गातून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी खालील नमूद केलेली मूळ कागदपत्रे तथा त्यांच्या साक्षांकित छायांकित ३ प्रती विद्यार्थ्यास सूचना देण्यात येईल तेव्हा विभागात प्रत्यक्ष येवून सादर करणे आवश्यक राहील.

- मूळ बारावी उत्तीर्णचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र साक्षांकित छायांकित ३ प्रती
- मूळ स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer / leaving Certificate) साक्षांकित छायांकित ३ प्रती

- जातीचे मूळ प्रमाणपत्र व साक्षांकित छायांकित ३ प्रती
- प्रगत व उन्नत गटाच्या मूळ दाखला (Non Creamy layer Certificate) व साक्षांकित छायांकित ३ प्रती
- शिक्षणात खंड असल्यास खंड दाखला (Gap Certificate)
- ज्या संवर्गातून प्रवेश घेणार आहे, त्याच्याशी संबंधित आवश्यक ती प्रमाणपत्रे.

**टिप :** मूळ प्रमाणपत्रे हे पात्रतेसाठी जमा केली जात असल्यामुळे महत्वाच्या कामासाठी उदा.वसतिगृह प्रवेश, शिष्यवृत्ती इत्यादीसाठी मूळ प्रमाणपत्राच्या जास्तीत जास्त छायांकित प्रती करून स्वत:जवळ ठेवाव्यात. पात्रता पूर्ण झाल्याशिवाय मूळ प्रमाणपत्र परत मिळणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

## पत्रकारिता पदविका (Diploma in Journalism) ला प्रवेश घेतेवेळी सादर करावयाची कागदपत्रे

विविध संवर्गातून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी खालील नमूद केलेली मूळ कागदपत्रे तथा त्यांच्या साक्षांकित छायांकित ३ प्रती विद्यार्थ्यास सूचना देण्यात येईल तेव्हा विभागात प्रत्यक्ष येवून सादर करणे आवश्यक राहील.

- मूळ बारावी उत्तीर्णचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र साक्षांकित छायांकित ३ प्रती
- मूळ स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer / leaving Certificate) साक्षांकित छायांकित ३ प्रती
- जातीचे मूळ प्रमाणपत्र व साक्षांकित छायांकित ३ प्रती
- प्रगत व उन्नत गटाच्या मूळ दाखला (Non Creamy layer Certificate) व साक्षांकित छायांकित ३ प्रती
- शिक्षणात खंड असल्यास खंड दाखला (Gap Certificate)
- ज्या संवर्गातून प्रवेश घेणार आहे, त्याच्याशी संबंधित आवश्यक ती प्रमाणपत्रे.

**टिप :१)** मूळ प्रमाणपत्रे हे पात्रतेसाठी जमा केली जात असल्यामुळे महत्वाच्या कामासाठी उदा.वसतिगृह प्रवेश, इत्यादीसाठी मूळ प्रमाणपत्राच्या जास्तीत जास्त छायांकित प्रती करून स्वत:जवळ ठेवाव्यात. पात्रता पूर्ण झाल्याशिवाय मूळ प्रमाणपत्र परत मिळणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

२) पत्रकारिता पदविका हा अभ्यासक्रम एक वर्षाचा असल्याने त्यासाठी शिष्यवृत्ती नाही. त्यामुळे विद्यार्थ्यास पूर्ण प्रवेश शुल्क (फी) भरावी लागेल.

## पत्रकारिता प्रमाणपत्र (Certificate Course in Journalism) ला प्रवेश घेतेवेळी सादर करावयाची कागदपत्रे

विविध संवर्गातून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी खालील नमूद केलेली मूळ कागदपत्रे तथा त्यांच्या साक्षांकित छायांकित ३ प्रती विद्यार्थ्यास सूचना देण्यात येईल तेव्हा विभागात प्रत्यक्ष येवून सादर करणे आवश्यक राहील.

- बारावी उत्तीर्णचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र याची छायांकित प्रत - ३ प्रती
- शाळा सोडल्याचा दाखला (छायांकित प्रत) - ३ प्रती

**टिप :** १. **प्रमाणपत्र अभ्यासक्रमास वसतीगृह व शिष्यवृत्तीची सुविधा उपलब्ध नाही.**

२. बारावी उत्तीर्ण गुणपत्रक, प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखला प्रवेश घेतेवेळी पडताळणीसाठी आवश्यक आहे. पडताळणी झाल्यावर सदरचे मूळ कागदपत्रे विद्यार्थ्यांस त्वरीत परत करण्यात येतील.

३. संपूर्ण फी एका टप्यात भरणे आवश्यक आहे.

## प्रवेशासाठी शुल्क भरण्याबाबत महत्वाची सूचना

● एम ए , बी.ए. पत्रकारिता आणि पदविका अभ्यासक्रास प्रवेश घेते वेळी विद्यार्थ्यास प्रवेश शुल्काची रक्कम विद्यापीठाने दिलेल्या Payment Getway वर भरावी लागेल. किंवा ऑनलाईन शुल्क भरण्यास तांत्रिक कारणास्तव अडथळा असेल तर प्रशाळेत येऊन अर्जावर सबंधिताचा शेरा घेऊन विद्यापीठाच्या वित्त विभागात (रुम नं ३१७ ) येथे रोख स्वरुपात भरुन त्याची पावती माध्यमशास्त्र प्रशाळेतील कार्यालयात संबंधितांकडे जमा करावी लागेल. तसेच, प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रवेश शुल्क माध्यमशास्त्र प्रशाळेत स्वत: रोखीने भरावयाचे आहे.

# प्रवेश शुल्क

## एम. ए. (एम.सी.जे.) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश (Fee Structure) शुल्क खालीलप्रमाणे

| Sr.No | Details of Fees | Ist Year | IInd Year |
|---|---|---|---|
| 1 | Caution Money Deposit | 200 | ---- |
| 2 | Admission Fee | 50 | 50 |
| 3 | Alumni Association | 400 | -- |
| 4 | Ashvamedha Fees | 100 | 100 |
| 5 | Computer Fee | 200 | 200 |
| 6 | Eligibility Fee | 150 | -- |
| 7 | E Suvidha Fee | 50 | 50 |
| 8 | Form/Pub sale/ Identity Card | 100 | 100 |
| 9 | Gathering & Extra Curriculum (EC) Fee | 100 | 100 |
| 10 | Green Energy Fees | 200 | 200 |
| 11 | Gymkhana Fee | 150 | 150 |
| 12 | Internal Exam Fee | 150 | 150 |
| 13 | Internet & Email Fee | 300 | 300 |
| 14 | Laboratory Deposit | 500 | -- |
| 15 | Laboratory Fee | 1000 | 1000 |
| 16 | Library Fee | 500 | 500 |
| 17 | Library Deposit | 500 | |
| 18 | Magazine Fee | 75 | 75 |
| 19 | Medical Fee | 50 | -- |
| 20 | Miss/other Receipts | 200 | 200 |
| 21 | NSS Fees | 10 | 10 |
| 22 | Personality Dev.& Career Guidance Fee | 100 | 100 |
| 23 | Poor Student Aid Fund | 100 | 100 |
| 24 | Registration Fee | 200 | -- |
| 25 | Student Group Insurance Fee | 20 | 20 |
| 26 | Student Welfare Fund | 150 | 150 |
| 27 | Tuition Fee | 4000 | 4000 |
| 28 | University Development Fund | 200 | 200 |
| 29 | Examination Fee | 2990 | 3740 |
| 30 | Convocation Fee | -- | 500 |
| 31 | Disaster Management fee | 10 | 10 |
| | **Total** | **12,755/-** | **12005/-** |

***Eligibility fee for other state students Rs. 300/-**

एम ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) अभ्यासक्रमातंर्गत अभ्यासदौरा असून अभ्यास दौ-यासाठी शुल्क त्या त्या परिस्थितीनुरूप किंवा प्रत्यक्ष खर्चानुसार त्या वर्षात आकारली जाईल. हा अभ्यासदौरा प्रत्येक विद्यार्थ्याला सक्तीचा राहील. * वसतीगृह प्रवेश हवा असल्यास त्याचे शुल्क तसेच खानावळीचे शुल्क विद्यापीठ नियमानुसार वेगळे द्यावे लागेल. * प्रवेश घेते वेळेस विद्यार्थ्यांना प्रवेश फी Installment ने भरता येईल. परंतु परीक्षा फी ही संपूर्ण भरणे अनिवार्य आहे.

# प्रवेश शुल्क

**बी. ए. (एम.सी.जे.) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश (Fee Structure) शुल्क खालीलप्रमाणे**

**शिक्षण शुल्क (Tution Fees) विविध शुल्क (other Fees)**

| अ.क्र | विविध शुल्क शासन निर्णय (शिष्यवृत्ती) प्रमाणे | विविध शुल्क | First Year | Second Year | Third Year | Fourth Year |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Admission Fee | Admission Fee | 50 | 50 | 50 | MA. MCJ First Year नुसार फी राहिल. |
| 2 | Library Fee | Library Fee | 500 | 500 | 500 | |
| | | Library Deposit | 1000 | 1000 | 1000 | |
| 3 | Gymkhana Fee | Gymkhana Fee | 150 | 150 | 150 | |
| 4 | College Magazine Fee | Magazine Fee | 100 | 100 | 100 | |
| 5 | Registration Charges | Registration Fee | 200 | ... | ... | |
| 6 | Students I.D Charges | Form/ Pub Sale/ Identity Card | 100 | 100 | 100 | |
| 7 | University Development Fund | University Development Fund | 200 | 200 | 200 | |
| 8 | University Ashvamedha Fund | Ashvamedha fee | 100 | 100 | 100 | |
| 9 | University Medical Aid Fund | Medical Fee | 50 | ... | ... | |
| 10 | University Students Assistance Fund / Welfare Fund | Poor Student Aid Fund | 100 | 100 | 100 | |
| 11 | University Students Insurance Fund | Student Group Insurance Fee | 20 | 20 | 20 | |
| 12 | Youth Festivel Charges | Yuva Rang Fee | 0 | 0 | 0 | |
| 13 | University Sports Fund | University Sports Fund | 0 | 0 | 0 | |
| 14 | Computer Training Fee | Computer Fee | 200 | 200 | 200 | |
| | | Internate & E mail Fee | 300 | 300 | 300 | |
| | | E Suvidha Fee | 50 | 50 | 50 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 15 | Extra Curiculum / Activity Fee | Alumni Association Fee | 400 | … | … | |
| | | Gathering & Extra Curiculum | 100 | 100 | 100 | |
| | | Field Work Fee / | 0 | 0 | 0 | |
| | | Industrial Visit Fee | 0 | 0 | 0 | |
| | | Study Tour | 0 | 0 | 0 | |
| | | NSS Self Finance Unit | 10 | 10 | 10 | |
| | | Personality Development & Career Guidance Fee | 100 | 100 | 100 | |
| | | Student Welfare fund | 150 | 150 | 150 | |
| | | Placement & Activity fee | 0 | 100 | 200 | |
| | | General Knowledge Fee | 0 | 0 | 0 | |
| | | Internal Exam Fee | 160 | 160 | 160 | |
| | | Eligibility Fee | 150 | … | … | |
| | | Environment Fee | 0 | 0 | 0 | |
| | | Green Energy Fee | 200 | 200 | 200 | |
| | | Mics /other receipt | 200 | 200 | 200 | |
| | | Finishing School | 0 | 0 | 0 | |
| | | Seminar & Workshop Fee | 200 | 200 | 200 | |
| | | Disaster Management Fee | 10 | 10 | 10 | |
| | | Caution Money Deposit | 200 | … | … | |
| | | Convocation Fee | … | … | 500 | |
| | | Total other Fee | 5000 | 4100 | 4700 | |
| | Tution Fee | Tution Fee | 4000 | 4000 | 4000 | |
| 16 | Laboratory Fee | Laboratory Fee | 1000 | 1000 | 1000 | |
| | | Total | 10000 | 9100 | 9700 | |
| | | Deposits | 500 | … | … | |
| | Examination Fee | Examination Fee | 3150 | 3750 | 3750 | |
| | | Total | **13650** | **12850** | **13450** | |

# प्रवेश शुल्क

**पत्रकारिता पदविका (Diploma in Journalism) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश (Fee Structure) शुल्क खालीलप्रमाणे**

| Sr.No | Details of Fees | Amount |
|---|---|---|
| 1. | Caution Money Deposit | 500 |
| 2. | Admission Fee | 50 |
| 3. | Alumni Association | 400 |
| 4. | Ashvamedha Fees | 100 |
| 5. | Computer Fee | 200 |
| 6. | Eligibility Fee | 150 |
| 7. | E Suvidha Fee | 50 |
| 8. | Form/Pub sale/ Identity Card | 100 |
| 9. | Gathering & Extra Curriculum (EC) Fee | 100 |
| 10. | Green Energy Fees | 200 |
| 11. | Gymkhana Gee | 150 |
| 12. | Internal Exam Fee | 150 |
| 13. | Internet & Email Fee | 300 |
| 14. | Laboratory Deposit | 1000 |
| 15. | Library Deposit | 1000 |
| 16. | Library Fee | 500 |
| 17. | Magazine Fee | 75 |
| 18. | Medical Fee | 50 |
| 19. | Miss/other Receipts | 200 |
| 20. | NSS Self Finance Unit | 10 |
| 21. | Personality Dev.& Career Guidance Fee | 100 |
| 22. | Poor Student Aid Fund | 100 |
| 23. | Registration Fee | 200 |
| 24. | Student Group Insurance Fee | 20 |
| 25. | Student Welfare Fund | 150 |
| 26. | Tuition Fee | 3000 |
| 27. | University Development Fund | 200 |
| 28. | Exam Fee | 1600 |
| 29. | Convocation Fee | 500 |
| 30. | Laboratory Fee | 1000 |
| | **Total** | **12,155/-** |

***Eligibility fee for other state students Rs. 300/-**

पत्रकारिता पदविका **(Diploma in Journalism)** अभ्यासक्रमातंर्गत अभ्यासदौरा असून अभ्यास दौ-यासाठी शुल्क त्या त्या परिस्थितीनुरूप किंवा प्रत्यक्ष खर्चानुसार त्या वर्षात आकारली जाईल. हा अभ्यासदौरा प्रत्येक विद्यार्थ्याला सक्तीचा राहील.

* वसतीगृह प्रवेश हवा असल्यास त्याचे शुल्क तसेच खानावळीचे शुल्क विद्यापीठ नियमानुसार वेगळे द्यावे लागेल.  * प्रवेश घेते वेळेस विद्यार्थ्यांना प्रवेश फि Installment ने भरता येईल. परंतु परीक्षा फि ही संपूर्ण भरणे अनिवार्य आहे.

# प्रवेश शुल्क

**पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Course in Journalism) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश (Fee Structure) शुल्क खालीलप्रमाणे असेल :-**

1)Certificate Course of Public Relations, 2) Certificate Course of Camera Handling,
3)Certificate Course of Video Editing, 4) Certificate Course of Radio Jockey,
5)Certificate Course of News Anchoring, 6) Certificate Course of Digital & Social Media,
7) Certificate Course of Newspaper Pagination,

**टिप-** प्रत्येक प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे शुल्क रु. ७०००/- (रुपये सात हजार मात्र).

## Admission Fee Structure for Three Months Certificate Course

| Sr. No | Details of Fees | Amount |
|---|---|---|
| 1 | Admission Fee | 50 |
| 2 | Alumni Association | -- |
| 3 | Ashvamedha Fees | -- |
| 4 | Computer Fee | 200 |
| 5 | Eligibility Fee | -- |
| 6 | E Suvidha Fee | 50 |
| 7 | Form/Pub sale/ Identity Card | 100 |
| 8 | Gathering & Extra Curriculum (EC) Fee | 100 |
| 9 | Green Energy Fees | 200 |
| 10 | Gymkhana Gee | -- |
| 11 | Internal Exam Fee | 150 |
| 12 | Internet & Email Fee | 300 |
| 13 | Laboratory Deposit | -- |
| 14 | Laboratory Fee | 1000 |
| 15 | Library Fee | 500 |
| 16 | Magazine Fee | -- |
| 17 | Medical Fee | 50 |
| 18 | Miss/other Receipts | -- |
| 19 | NSS Self Finance Unit | -- |
| 20 | Personality Dev.& Career Guidance Fee | 120 |
| 21 | Poor Student Aid Fund | 100 |
| 22 | Registration Fee | 200 |
| 23 | Student Group Insurance Fee | 20 |
| 24 | Student Welfare Fund | 150 |
| 25 | Tuition Fee | 3000 |
| 26 | University Development Fund | 200 |
| 27 | Disaster Management fee | 10 |
| 28 | Examination Fee | 500 |
| | **Total** | **7,000/-** |

- पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम **(Certificate Course in Journalism)** अभ्यासक्रमातंर्गत अभ्यासदौरा असून अभ्यास दौ-यासाठी शुल्क त्या त्या परिस्थितीनुरूप किंवा प्रत्यक्ष खर्चानुसार त्या वर्षात आकारली जाईल. हा अभ्यासदौरा प्रत्येक विद्यार्थ्याला सक्तीचा राहील.